Estd.: 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
**PHONE : EPABX-2609000**
☐ **FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333**
**शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र**
☐**दुरध्वनीः (ईपीएबीएक्स) 2609000**
☐**तारः युनिशिवाजी फॅक्सः 0091–0231–2691533 व 0091–0231–2692333**
☐**Department of Sports:**Fax- 0231-2694619. Phone Nos.- 0231-2609266
☐**Email id**: hod.sports.shivaji@gmail.com, ptgaikwad64@gmail.com, sports@unishivaji.ac.in

शि.वि. / क्रीडा / फा.– 28 / 00055 दि. 15 / 11 / 2021

प्रति,

1. प्राचार्य,
   संलग्न महाविद्यालये व
   संस्था.
2. सर्व विभाग प्रमूख,
   पदवी व पदव्युत्तर अधिविभाग,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
3. पी.जी.ॲडमिशन विभाग.
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– शिवाजी विद्यापीठ क्रीड व शारीरिक शिक्षण मंडळ अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील होणा–या क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :– सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचा ब्रेक द चेन आदेश क.कोरोना–2021 / प्र.क.421 / आ–5, दि.06 ऑक्टोंबर, 2021 रोजीचा आदेश.**

महोदय / महोदया,

वरील संदर्भाकित शासन निर्णय आणि शिवाजी विद्यीपठ, कोल्हापूर यांचे परिपत्रकानूसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे व त्यांचाशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत सूचना, आदेश तसेच एस.ओ.पी.मध्ये नमूद केल्यानुसार अंमलबजावणी करुन महाविद्यालये दि.20 ऑक्टोंबर, 2021 पासून सुरु करण्यात आलेली आहेत. शैक्षणिक उपक्रमासोबत विद्यार्थ्याचा सर्वागिण विकास होण्यासाठी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचे संकेत अखिल भारतीय विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांचे संदर्भ पत्र क्र ए आय यू / एएससी / 2021–22, दि 05 ऑक्टोबर, 2021 चे पत्रानुसार सर्व विद्यापीठांना मिळाल्या आहेत. यासाठी कोविड–19 या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड–19 उपाययोजना नियम 2020 अंमलात आलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष 2021–22 मध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांचेवतीने विभागीय, आंतर विद्यापीठ, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व खेलो इंडिया या स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आल्यानूसार शिवाजी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ अंतर्गत येणा–या कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा या विभागाच्या कक्षेत आंतर महाविद्यालयीन तसेच आंतर विभागीय स्पर्धाचे आयोजन करून विद्यापीठ संघ निवड करावी लागणार आहे. त्याकरीता खालील उपाययोजना सर्व क्रीडा स्पर्धाकरीता अंमलात आणावी जेणेकरुन कोविड 19 संसर्ग नियंत्रात राहील.

## अ कोविड–19 सामान्य प्रतिबंधात्मक उपाय :–

कोविड–19 चा धोका कमी करण्यासाठी खालील सार्वजनिक आरोग्य उपायांचे पालन केले पाहिजे (शारीरिक शिक्षण संचालक,. खेळाडू, संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक, आणि स्पर्धेसाठी आवश्यक सर्व कर्मचारी) यांनी स्पर्धेच्या काळात खालील गोष्टींचे पालन करावे.

1. शक्य तेवढे किमान 6 फुटाचे अंतर पाळावे
2. मास्क / फेसकव्हरचा वापर करणे अनिवार्य आहे.
3. हात जरी स्पष्टपणे घाणेरडे नसले तरी साबणाने अगर हॅण्डवॉशने वारंवार हात धुणे (किमान 40–60 सेकंदासाठी) अल्कोहोल आधारित हॅण्ड सॅनिटायझर्सचा वापर (कमीत कमी 20 सेकंदासाठी) शक्य असेल तेथे करणे
4. श्वसन शिष्टाचार काटेकोरपणे पाळले पाहिजेत. यामध्ये शिंकताना टिश्यु / रूमाल / लवचिक कोपराने तोंड आणि नाक झाकने आणि वापरलेल्या वस्तूंची योग्यप्रकारे विल्हेवाट लावणे यांचा समावेश आहे.
5. सर्वानी स्वतःच्या आरोग्याचे स्वतः निरीक्षण करणे आणि कोणत्याही आजाराची लवकरात लवकर माहिती देणे.
6. थुंकण्यास सक्त मनाई आहे.
7. आरोग्य सेतू ॲप डाउनलोड करणे आणि शक्य असेल तेथे वापर करण्याचा सल्ला दिला जाईल.

## ब क्रीडा स्पर्धा प्रतिबंधात्मक उपाय

1. महाविद्यालयामधील शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा विभागाशी संबंधित सेवक वर्ग यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पुर्ण होणे आवश्यक राहील.
2. लसीकरणाचे मात्रा पूर्ण झालेले प्रमाणपत्र (Certificate for COVID-19 Vaccination fully Vaccinated : 2nd Dose) खेळाडूंना स्पर्धा पात्रता अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
3. सहभागी खेळाडूचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले अनिवार्य राहील. लसीकरणाचे दोन डोस झालेले नसल्यास अशा खेळाडूस कोणत्याही स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. तथापी 18 वर्षे पूर्ण नसलेल्या खेळाडूंना स्वखर्चाने RTPCR चाचणी करुन 48 तासापूर्वी त्याचा अहवाल स्पर्धेपूर्वी सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच सदर खेळाडूची विद्यापीठ संघात निवड झालेस त्याचा स्पर्धेला जाणेपूर्वी एक दिवस आधी RTPCR चाचणी स्वखर्चाने करुन त्याचा अहवाल सादर करणे बंधनकारक राहिल.

4. स्पर्धेकरीता वापरण्यात येणारे क्रीडासाहित्य व उपकरणे ही पूर्णतः सॅनिटाईज करूनच वापरात आणावीत. विना सॅनिटाईज क्रीडासाहित्य अथवा उपकरणांचा वापर करू नये. क्रीडासाहित्य व उपकरणे यांचा वापर केल्यानंतरही हात व साहित्य सॅनिटाईज करावे.

5. स्पर्धेदरम्यान तसेच क्रीडागंणावर सोशल डिस्टसिंगचे (Covid Appropriate Beavior) पालन करणे बंधनकारक राहील.
6. क्रीडांगणावर स्पर्धेसाठीचे पंच, ग्राउंडसमन इ. चे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पुर्ण झालेले असणे अनिवार्य राहील
7. विद्यापीठाचे अंतर्गत होणा–या सर्व स्पर्धा हया सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. 06 ऑक्टोबर, 2021 रोजीच्या ब्रेक द चेन आदेशासोबत Standard Operating Procedure सहपत्रानुसारच होतील.
8. मैदानावर सॅनिटायझरची व्यवस्था करावी.
9. खेळाडूंना वसतिगृहात निवासाची वेळ आल्यास एकूण 50 टक्के क्षमतेनेच सर्व निकष पाळून निवास व्यवस्था करावी.
10. संघानी प्रवासदरम्यान सर्व प्रोटोकॉलचे पालन करावे.
11. खेळाच्या/ प्रशिक्षण सुविधांच्या सामान्य क्षेत्रात प्रवेश देण्यापूर्वी खेळाडू आणि कर्मचा–यांची तपासणी केली जाईल व त्यांनी लसीकरणाच्या दोनही मात्रा घेतली असणे आवश्यक असेल.
12. स्पर्धेदरम्यान निवासाचे ठिकाणी साबण, टॉवेल व इतर वस्तू हया स्वतःच्या स्वतः वापराव्यात इतरांना वापर करण्यास देवू अथवा घेवू नये.
13. स्पर्धा आयोजनाबाबतचा तसेच दैनंदिन क्रीडांगणाचा वापर सुरू करणेबाबतचा निर्णय हा आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कोविड–19 च्या प्रार्दुभावाचा आढावा घेवून तसेच स्थानिक प्रशासनाची परवानगी घेवून त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही अपेक्षित राहील.

तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

क्रीडा अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

आपला विश्वासू,

प्र.संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.